# Emotional Audition Script in Marathi | इमोशनल ऑडिशन स्क्रिप्ट इन मराठी

www.marathiauditionscript.com

**Insta,Facebook,Youtube id: audition script free**

काय गणोपंत आज उशीर झाला उठायला ... काल रात्री रात्री डोळ्यावरची झोप उडून जावी म्हणून गुपचूप घेतलेला कोरा चहा जास्त झाला की काय ..हा हा हा ..

असो बाकी काही सकाळच्या व्यायामाला उपस्थित राहिलात हे महत्वाच नाही का .चला मग आता सूर्य अजून वर यायच्या आधी व्यायामाला सुरुवात करूया.

काय डोळे..? (कुणीतरी  समोरून विचारण्याचा आभास) नाही ओ..माझे डोळे कशाला पाणावलेत ? उगाच आपलं काहीतरी. चला व्यायामाला उशीर होतोय. (थोड इग्नोर करत )

हो खरं आहे तुम्ही बोलताय ते... मुलगा आला होता मला भेटायला. कित्येक वर्षांनी आज या बापाची आठवण झाली असावी. त्या साफसफाईवाल्या पोरीने येऊन सांगितलं तुमचा पोरगा आलाय अस वाटलं माझ्या काळजी पोटी, माझी विचारपूस करायला आला असेल म्हणून पण कसलं काय पोटच्या पोरांपेक्षा कधी कधी वाटतं ही पोर तरी बरी ना कुठला स्वार्थ की ना कुठली अपेक्षा.

सही घेण्यासाठी आला होता त्याला वाटल मी अचानक गेलो तर नावावरची जमीन हातातून निघून जाईल म्हणून. १० वर्ष झाली या आश्रमात सोडून गेल्यावर पण एकदातरी म्हातारा मेलाय की जिवंत आहे याची चौकशी सुद्धा करावीशी वाटली नाही त्याला.

सुरुवातीला वाटायचं हे अस दिवस ढकलून जगण्यापेक्षा एकदाच मरण आलं तर पिढा निघून जाईल कायमची त्याच्याही डोक्यावरची आणि माझ्याही. सुदैवाने तुमच्यासारखे मित्र मिळाले , इथे प्रत्येकाकडे काहीना काही दुःख आहे प्रत्येकजण कुठल्या ना कुठल्या स्वरूपाचा संघर्ष करतोय. तसही संघर्ष काय कुणाला चुकलाय का..? पण या काळात जर आपली माणसं सोबत असतील तर शुल्लक वाटतो.

त्यामुळे विसरून जायच्या या कटू आठवणी आणि उरलेल्या या तुटपुंज्या आयुष्यात नव्याने आठवणी निर्माण करायच्या. काय..!

चला आता व्यायाम करूया की आज फक्त गप्पागोष्टीमध्येच दिवस काढायचाय. हा हा हा ...(डोळे पुसत... आनंदाश्रु..हसत)